## MAHARASHTRA ACT No. XLII OF 1989.

### THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT PROCESSING AND MARKETING (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION) ACT, 1989.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १५ नोव्हेंबर १९८९, रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. SLII OF 1989.

### AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT PROCESSING AND MARKETING) ACT, 1971, WITH RETROSPECTIVE EFFECT

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २३ ऑक्टोबर १९८९, रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२.

**महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९७१ चा महाराष्ट्र ४७. १९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.

आणि **ज्याअर्थी,** "महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याच्या मुदतीत, यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले आहे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि म्हणून, त्यांनी २९ सप्टेंबर १९८९ रोजी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अध्यादेश, १९८९", प्रख्यापित केला होता;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चाळीसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. या अधिनियमास, 'महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अधिनियम, १९८९' असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक ३० जून १९८९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. 'महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१' (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम १ मधील पोट-कलम (४) मध्ये, सन "१९८९" या आकड्याऐवजी "१९९०" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९७१ चा महाराष्ट्र ४७.

व्यावृत्ती. ३. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने केलेली वाढीव मुदत वगळता, तिने १ जुलै १९८९ रोजी प्रारंभ होणाऱ्या व २९ सप्टेंबर १९८९ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही कृतीबद्दल, अशी कृती किंवा अकृती हा अपराध नसेल तर, कोणत्याही अपराधाबद्दल दोषसिद्धीस पात्र असणार नाही.

शंका दूर करणे. ४. शंका दूर करण्याकरिता याद्वारे असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून १९८९ नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत त्या दिनांकापासून, दिनांक ३० जून १९९० हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत या अधिनियमाद्वारे भूतलक्षी प्रभावाने वाढविल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झाला होता असे कधीच मानले जाणार नाही व या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीन राहून अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

सन १९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती. ५. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अध्यादेश, १९८९ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये, यथास्थिति, केलेली गोष्ट किंवा करण्यात आलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,

भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.